**पेसा ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजना ग्रामविकास विभागाकडे वर्ग करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पेसाअ -२०१९/प्र.क्र.८८/का.१७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १९ जून, २०१९

<u>वाचा:-</u>
१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाची अधिसूचना क्र. आरबी/टीसी/ ई-११०१९(८९) (२०१३) /नोटिफिकेशन-४/११२०/२०१४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४.
२. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. पेसा-२०१५/ प्र.क्र.१९ / का-१७, दि. २१ एप्रिल, २०१५.
३. आदिवासी विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. पेसा-२०१५/ प्र.क्र.१९ / का-१७, दि. २० फेब्रुवारी, २०१६.
४. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाची अधिसूचना क्र. आरबी/टीसी/ ई-१३०१२ (१) (२०१५) /नोटिफिकेशन/५०६/२०१६, दिनांक १३ एप्रिल, २०१६.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना दरवर्षी आदिवासी उपयोजनेंतर्गत ५% निधी थेट देण्याच्या योजनेस (पेसा ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजना) आदिवासी विकास विभागाच्या वाचा क्र. २ वरील दि. २१.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानंतर मा. राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाच्या निर्देशानुसार वाचा क्र. ३ वरील शासन शुध्दीपत्रक दि. २०.०२.२०१६ अन्वये दि.२१.०४.२०१५ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सन २०१५-१६ मध्ये अनुसूचित क्षेत्रातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वितरीत करण्यात आला. तथापि त्यानंतर वाचा क्र. ४ वरील मा. राज्यपाल महोदयांच्या दि. १३.०४.२०१६ च्या अधिसूचनेनुसार सन २०१६-१७ पासून अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत करण्यात येतो.

पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ (पेसा, १९९६) हा अधिनियम पंचायतींशी संबंधीत असून सदर अधिनियमान्वये ग्रामसभेला अनेक अधिकार प्रदान केले आहेत. पंचायतराज व्यवस्थेची प्रशासकीय यंत्रणा ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखाली असल्याने पेसा ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजनेचे प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण होण्याकरीता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ११.०२.२०१९ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीत सदर योजनेची ग्रामविकास

विभागामार्फत अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार सदरची योजना ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

प्रस्तावनेत नमूद केल्यानूसार महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५० व्या बैठकीत निर्णय झाल्यानुसार राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना दरवर्षी आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाच्या ५% निधी उपलब्ध करुन देण्याची योजना (पेसा ग्रामपंचायतींना ५% थेट निधी योजना ) ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर योजनेच्या संनियंत्रणासाठी महाऑनलाईन मार्फत विकसित केलेली pesafundmanagement.maharashtra.gov.in ही या संगणक प्रणाली सुध्दा ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्यात येत आहे. तथापि, सदर योजनेचे संनियंत्रण करण्याकरीता वरील संगणक प्रणालीचे युजर नेम व पासवर्ड ग्रामविकास विभागाने या विभागास उपलब्ध करुन द्यावेत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१९०६१९१५४१०६६०२४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

GAJANAN RAMDAS DESHMUKH

Digitally signed by GAJANAN RAMDAS DESHMUKH
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9adf2fe1f77176611c6dae66e0049cd0f51f36579d7c577ba3ed2c944d27d926, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=dee8a196fb0bb879933a88f87075cc443d363994879d49e0c1ba541465369700, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=GAJANAN RAMDAS DESHMUKH
Date: 2019.06.19 15:42:36 +05'30'

**( गजानन रा. देशमुख )**
कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई-३२.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा. मंत्री/राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री.
५. सर्व विधानसभा/ विधानपरिषद सदस्य.
६. मा. मुख्यसचिव यांचे सहसचिव.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-०१.
१०. प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१३. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक.

१४. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१५. आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे.
१६. विभागीय आयुक्त, कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती व नागपूर.
१७. जिल्हाधिकारी, ठाणे/पालघर/नाशिक/धुळे/नंदूरबार/जळगाव/अहमदनगर/पुणे/नांदेड/यवतमाळ/अमरावती/गडचिरोली व चंद्रपूर.
१८. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर/अमरावती/नाशिक व ठाणे.
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे/पालघर/नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर/पुणे/नांदेड/यवतमाळ/अमरावती/गडचिरोली व चंद्रपूर.
२०.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय.
२१.सर्व संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती.
२२. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२३. सर्व सह सचिव/उप सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
२४. सर्व संबंधित जिल्हा कोषगार अधिकारी
२५. वित्त विभाग, (व्यय १४/अर्थ १९), मंत्रालय, मुंबई-३२.
२६. सर्व मंत्रालयीन विभाग
२७. सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२८.कक्ष अधिकारी, का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
२९. निवड नस्ती (का.१७).